—: **प्रेसनोट** :— दिनांक : २१/०७/२०२३

| | |
|---|---|
| ओ.सी.बी. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २६/२०२३ |
| कलम | कलम— कलम ७ (अ), भ्र.प्र.अधि. १९८८ |
| आरोपी इसम | श्री मंगेश नाना भोपळे, पो.शि.क्र.०९३३३५, नेमणुक — आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २०,००,०००/— (वीस लाख रूपये) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | निरंक |

थोडक्यात हकीकत — सदर गुन्हयातील मुळ अर्जदार इसम नामे फिरोज उस्मान टिनवाला, रा.ठि.— पेडर रोड, मुंबई यांची मयुर बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स नावाने बांधकाम व्यवसायाची फर्म आहे. सदर फर्मव्दारे आदर्श नगर विकास सोसायटी, आर.ए.के. मार्ग, वडाळा पश्चिम, मुंबई येथील झोपडपटटी विकासित करण्याचे काम चालू होते. नमुद ठिकाणी फर्मव्दारे केलेल्या बांधकामामध्ये राहत असलेल्या बेकायदेशीर रहिवाशी यांना बाहेर काढण्याकरिता तहसीलदार एस.आर.ए. मुंबई यांनी आदेश पारीत केले होते व त्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्याचे आदेश झाले होते. त्याअनुषंगाने अर्जदार टिनवाला हे आर.ए.के.मार्ग पोलीस स्टेशन येथील व.पो.नि. निंबाळकर, पो.शि. महेश, तसेच पो.शि. क्र. ०९३३३५/भोपळे यांना भेटले व त्यांना अर्जदार टिनवाला यांनी सदर ठिकाणी सोसायटीच्या बांधकामाकरिता आलेली पाच ते सहा कुटुंब कामगार व कंत्राटदार राहत असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.शि. मंगेश भोपळे यांनी मोबाईलव्दारे अर्जदार टिनवाला यांना दि. ०५/०७/२०२३ रोजी संपर्क साधून एस.आर.ए.च्या अधिकारी यांना वीस ते पंचवीस दिवस उशीरा पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी रू.२०,००,०००/— लाचेची मागणी केली. नमुद बाबत अर्जदार टिनवाला ला.प्र.वि. मुंबई येथे दि. ०५/०७/२०२३ रोजी लाच मागणी प्रकरणी कारवाई होणेसाठी तक्रार अर्ज केला.

अर्जदार टिनवाला यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने ला.प्र.वि. मुंबई येथील पो.नि. शहानवाज मुल्ला यांनी चौकशी केली व चौकशीअंती पो.शि.क्र. ०९३३३५/मंगेश नाना भोपळे, नेमणूक— आर.ए.के.मार्ग पोलीस स्टेशन मुंबई यांनी अर्जदार टिनवाला यांच्याकडे एस.आर.ए. अधिकारी यांना पोलीस बंदोबस्त उशीरा पुरविण्याकरिता रू. २०,००,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले म्हणून पो.नि. शहानवाज मुल्ला यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पो.शि.क्र. ०९३३३५/मंगेश नाना भोपळे, नेमणूक— आर.ए.के. मार्ग पोलीस स्टेशन मुंबई यांच्याविरूध्द नमुद गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलअॅप :www.acbmaharashtra.net.

२१/०७/२०२३

**( नितीन दळवी )**
**सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**